आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
४ नोव्हेंबर २०२६ - बुधवार

ठळक बातम्या

- राज्यातल्या दुष्काळग्रस्त भागातल्या ७३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपयांची मदत जमा

- ५०० कोटी रुपयांहून अधिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांमध्ये ५ नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीचा राज्य सरकारचा निर्णय

- सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामिल करुन घेण्यासाठीच्या योजनेला केंद्र सरकारची मंजुरी

आणि

- न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत भारताची विजयी सलामी

<><><><><>

राज्यातल्या ७३ लाख दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपयांची मदत जमा झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत दिली.

- -- होल्ड - मुख्यमंत्री - - -

राज्यातल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्याचा सरकारचा प्रयत्न असून सर्व मंत्री यंदाची दिवाळी शेतकऱ्यांसोबत साजरी करणार असल्याचं ते म्हणाले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेंतर्गत आज ४ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात जवळपास पावणे ५ हजार कोटी रुपये जमा केले आहेत. यातले निम्म्याहून अधिक लाभार्थी मराठवाड्यातले असल्याची माहिती त्यांनी दिली. आतापर्यंत २१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात १९ हजार कोटी रुपये जमा झाले आहेत. याद्यांचं प्रमाणीकरण झाल्यावर इतर लाभार्थ्यांच्या खात्यात निधी जमा होईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

राज्यात ५०० कोटींहून अधिक उलाढाल असणाऱ्या सहकारी संघांत पाच नामनिर्देशित सदस्य नियुक्त करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा आणि अध्यादेश काढायलाही मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -

(कायद्यातल्या सध्याच्या तरतुदींनुसार, सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर संस्थेने स्वीकृत केलेले २ संचालक आणि २ शासन नामनिर्देशित संचालक नियुक्त करता येतात. त्यात सुधारणा करायचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. नव्या निर्णयानुसार नामनिर्देशित पाच सदस्यांपैकी या संस्थांच्या कार्याचा अनुभव असलेल्या चार व्यक्ती असतील आणि पाचवा सदस्य सहाय्यक निबंधक किंवा वरिष्ठ पातळीवरचा सरकारी अधिकारी असेल. शासकीय अधिकाऱ्याला मताचा अधिकार नसेल मात्र इतर चार सदस्य मतदान करु शकतील. पण त्यांना पदाधिकारी पदाची निवडणूक लढवता येणार नाही. नुकत्यात झालेल्या गोकुळ दुध संघाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. अधिनियमातील ही सुधारणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना लागू राहणार नाही. नियमभंग केलेल्या वाहनांवरील थकीत दंड भरून, वाहन दंड मुक्त करण्यासाठी अभय योजनेला सरकारनं मंजुरी दिली. या निर्णयानुसार प्रलंबित दंडाच्या रकमेवर वीस टक्क्यांची सवलत मिळणार आहे.

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृहात राहणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांच्या विभागीय स्तरावर दीड हजार तर जिल्हा स्तरावर तेराशे रुपये निर्वाह भत्ता मिळेल. महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या पशुवैद्यक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आंतर्वासिता निर्वाह भत्यात सात हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णयही राज्य सरकारनं आज घेतला.)

<><><><><>

पाणी टंचाई आणि पुरवठ्यासंदर्भातल्या कामांची गेल्या दोन वर्षातली थकीत बिलं आठ दिवसात देण्याचे निर्देश दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबईत झालेल्या बैठकीत दिले आहेत. जलजीवन मिशनची उर्वरित २५ टक्के कामं तातडीनं पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. रोजगार हमीच्या माध्यमातून व्हीबीजी रामजी अंतर्गत होणाऱ्या कामांच्या मजुरीचे दर वाढवण्याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली असून, येत्या १० दिवसांत त्यावर निर्णय घेतला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी आता एका जिल्ह्याला दुसऱ्या जिल्ह्यात किंवा विभाग स्तरावर चारा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयातून जिल्ह्यांची चारा गरज भागवावी, असं स्पष्ट करण्यात आलं. याशिवाय, गाळपेर जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना ज्वारी, मका, हरभरा इत्यादी पिकं घेण्यासाठी मंजुरी दिली आहे. मायक्रो फायनान्स कंपन्यांनी कर्ज वसुलीसाठी दबाव आणू नये असे निर्देश कंपन्यांच्या अध्यक्षांना या बैठकीत देण्यात आले.

<><><><><><>

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागात आजपासून १ हजार ४४० नवनियुक्त वैद्यकीय अधिकारी दाखल झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या अधिकाऱ्यांना नियुक्ती आदेश वितरित करण्यात आले.

<><><><><><>

सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामिल करुन घेण्यासाठीच्या योजनेला केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. या आणि इतर मंत्रीमंडळ निर्णयांविषयी जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून...

- - होल्ड कॅप्सूल - - -

(अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीतले सुमारे १८ हजार अग्निवीरांचा ४ वर्षाचा कालावधी डिसेंबरमध्ये पूर्ण होणार आहे. सध्याच्या योजनेनुसार ४ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर २५ टक्के अग्नीवीरांना सैन्य दलात सामील केलं जात होतं. आता उर्वरित अग्निवीरांना सैन्यात सामावून घेण्यासाठीच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे. याविषयी सैन्यदल प्रमुख एन. एस. राजा सुब्रमणी यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत अधिक माहिती दिली .

होल्ड - सीडीएस बाइट

लष्कराच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन अग्नीवीरांना तंत्रसज्ज तसंच भविष्यातल्या युद्धप्रणालीसाठी तयार करण्याकरता हे २ वर्षांचं अतिरीक्त प्रशिक्षण दिलं जाणार असल्याची माहिती संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिली.

बाल लैंगिक अत्याचार आणि बलात्कार पीडितांचे खटले चालवण्याचे साडे आठशे जलदगती न्यायालयं आणखी ५ वर्ष सुरू ठेवायचा निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळानं घेतल्याचं

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. देशात ९२ गीगावॅट क्षमतेच्या ऊर्जा साठवणूक योजनेला केंद्र सरकारनं मंजुरी दिल्याचंही ते म्हणाले.

होल्ड - अश्विनी वैष्णव बाइट

याशिवाय विविध योजनांसाठी योग्य माहिती उपलब्ध व्हावी याकरता सरकारनं सांख्यिकी क्षेत्रात सुधार करणार आहे.)

<><><><><>

भारतीय क्रिकेट संघानं आपल्या न्यूझीलंड दौऱ्यातल्या एकदिवसीय मालिकेत विजयी सलामी दिली आहे. आज ऑकलंड इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं न्यूझीलंडवर ५ गडी राखून विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून यजमान संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं, आणि ४० षटक आणि २ चेंडूत १८५ धावात त्यांचा डाव रोखला. हर्षदीप सिंगनं ४, गुरनून ब्रारनं ३, तर अंशुल कंबोजनं २ गडी बाद केले.

पावसामुळे भारताला विजयासाठी ३२ षटकात १४३ धावांचं लक्ष्य देण्यात आलं. भारतानं २२ षटकं आणि ४ चेंडूत ५ गडी गमावून ते पूर्ण केलं. विराट कोहलीनं ७४, तर शुभमन गिलनं ३७ धावांचं योगदान दिलं.

या विजयामुळे ५ सामन्यांच्या या मालिकेत भारतानं १-० अशी आघाडी घेतली आहे.

<><><><><>

दोनपेक्षा जास्त अपत्यं असणं दंडनीय ठरवणारा कायदा कालबाह्य झाला आहे, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. या कायद्यांतर्गत सरपंच पदाच्या निवडणुकीसाठी अपात्र ठरलेल्या मंगला भीमराव इंगळे यांच्या याचिकेवर, न्यायालयानं हे मत व्यक्त करत, इंगळे यांच्या अपात्रतेचा निर्णय रद्द केला.

गेल्या काही दशकांमध्ये झालेल्या लोकसंख्यात्मक बदलांमधे, भारतातल्या एकंदर जननदरात लक्षणीय घट झाल्याची बाब महत्वाची आहे. यामुळे लोकसंख्या प्रचंड वाढण्याची भीती संपली आहे. त्यामुळे या कायद्याचा फेरविचार केला पाहिजे. तसंच यापूर्वी या कायद्याला वैधता देणाऱ्या निर्णयाचाही फेरविचार केला पाहिजे, असं मत न्यायमूर्ती पी एस नरसिंहा आणि न्यायमूर्ती अलोक आराधे यांच्या पीठानं व्यक्त केलं.

<><><><><>

न्यायालयाच्या आदेशांचं पालन न केल्याबद्दल मुंबई महापालिका आयुक्तांचं वेतन थांबवण्याचे आदेश दिल्याच्या पार्श्वभूमीवर आज मुंबई महानगरपालिकेनं बोरीवली इथं अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबवली. ही कारवाई केल्याची माहिती पालिकेनं सर्वोच्च न्यायालयाला दिली असून या संदर्भातलं प्रतिज्ञापत्र उद्यापर्यंत दाखल केलं जाणार आहे.

<><><><><><>

दिवाळीत फटाके उडवण्यावर वेळेची मर्यादा लावण्याचा विचार करावा, असं मुंबई उच्च न्यायालयाने राज्यसरकारला सांगितलं आहे. पर्यावरणाचा ऱ्हास आणि आरोग्यविषयक समस्या रोखण्याच्या दृष्टीनं दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात फटाके उडवण्यावर सर्वोच्च न्यायालयाने सकाळी ६ ते ७ आणि रात्री ८ ते १० अशी वेळेची मर्यादा घातली आहे, त्याचा उल्लेख न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने केला आहे. अभिनेत्री दिया मिर्झाच्या ध्वनिचित्रफितीसंदर्भात न्यायालयाने दिलेल्या आदेशाची लेखी प्रत आज जारी झाली. त्यात न्यायालयाने ही सूचना केली आहे.

<><><><><><>

दीक्षान्त समारंभ हा केवळ पदवी प्रदान करण्याचा औपचारिक सोहळा नसून ज्ञान, चिकाटी, बौद्धिक विकास आणि स्वप्नपूर्तीचा आनंदोत्सव आहे, असं प्रतिपादन राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी केलं .

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६७ व्या दीक्षान्त समारंभात आज ते बोलत होते. यावेळी ३३४ संशोधकांना विद्यावाचस्पती पदवी प्रदान करण्यात आली.

<><><><><><>

चंद्रपूरच्या अन्न आणि औषध प्रशासनानं 10 आस्थापनांचे परवाने निलंबित केले आहेत. तसंच 15 प्रकरणामध्ये भेसळीच्या संशयावरून 36 लाख रूपये किंमतीचा सुमारे ९ हजार किलो अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

<><><><><><>

गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त झाल्यावर केवळ भौतिक सुविधा उपलब्ध करून देणं पुरेसं नसून, नागरिकांमध्ये सकारात्मक बदल घडणं आवश्यक असल्याचं ज्येष्ठ पत्रकार

कार्तिक लोखंडे यांनी आज सांगितलं. ते आज गडचिरोलीमध्ये पत्र सूचना कार्यालय आणि पोलिस विभागानं आयोजित केलेल्या 'नक्षलमुक्त भारत' या विषयावरच्या परिषदेत बोलत होते.

<><><><><><>

बांधकामांमुळे निर्माण होणाऱ्या ध्वनिप्रदूषण रोखण्याच्या उपायांची प्रभावी अंमलबजावणी होणं आवश्यक असून हे महापालिकेचं कर्तव्य आहे. मुंबईत बांधकामांच्या जागांवर परवानगी दिलेल्या आवाजाच्या पातळीचा भंग होत नसल्याचं आश्वासन दिल्याशिवाय कोणतंही बांधकाम पुढे नेण्याची परवानगी देऊ नये, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले. एका पुनर्विकास प्रकल्पाच्या बांधकामामुळे ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचं उल्लंघन होत असल्याबद्दलची याचिकावरच्या सुनावणीप्रकरणी न्यायालयानं हे आदेश दिले.

//<><><><><><>//